# कोंकण विकास महामंडळ मर्यादित

## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

युनिट क्र.१६,आरे दुग्ध वसाहत,
गोरेगांव (पूर्व ), मुंबई - ४०००६५

# ४३ वा वार्षिक अहवाल

# २०१३-२०१४

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**

**२०१३-१४**

## अनुक्रमणिका


| | | | | | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| संचालक मंडळ | --- | --- | --- | --- | २ |
| नोटीस | --- | --- | --- | --- | ३ |
| संचालकाचा अहवाल | --- | --- | --- | --- | ४ |
| लेखा परीक्षकांचा अहवाल | --- | --- | --- | --- | ७ |
| ताळेबंद | --- | --- | --- | --- | १४ |
| नफा-तोटा पत्रक | --- | --- | --- | --- | १५ |
| परिशिष्टे : १ ते २० | --- | --- | --- | --- | १६ |
| भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अहवाल | | | | --- | ३४ |
| लेखे प्रलंबित राहण्याची कारणे | --- | --- | --- | --- | ३५ |

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित

## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

## २०१३—२०१४

### संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.शि. वि.पाटील | ... | व्यवस्थापकीय संचालक | दिनांक १ जानेवारी, २०१३ पासून |
| श्री. आर. के. निखारगे | ... | संचालक | दिनांक २२ सप्टेंबर,२००९ ते १० मार्च,२०१५ पर्यंत |
| श्री. ए.आर.चांदोरीकर . | ... | संचालक | दिनांक ८ ऑगस्ट, २०१२ पासून |
| श्री. संजय देगांवकर | | संचालक | दिनांक १० मार्च, २०१५ पासून |

लेखापरीक्षक

**विरेन गांधी ॲन्ड कंपनी**

**सनदी लेखापाल, मुंबई.**

सॉलीसीटर्स

मे. दिवेकर आणि कंपनी, मुंबई.
मे.लता देसाई आणि सॉलीसीटरर्स

बँकर्स

स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, बँक ऑफ बरोडा, बँक ऑफ इंडिया

**नोंदणीकृत कार्यालय**

**युनिट नं. १६, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव ( पु. ), मुंबई—४०० ०६५.**

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

**सूचना**

विषय –– तहकूब झालेल्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

कोंकण विकास महामंडळाच्या भागधारकांची दिनांक  १६ सप्टेंबर, २०१४ रोजी वार्षिक लेखे तयार नसल्यामुळे तहकूब झालेली ४३वी वार्षिक सर्वसाधारण सभा आता सोमवार दिनांक ११.०६.२०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता महामंडळाच्या नोंदणीकृत कार्यालयात येथे बोलाविणेत आली आहे. सभेपुढील कामकाजाचे विषय खालील प्रमाणे आहेत:–

(१) दिनांक ३१ मार्च २०१४ अखेरचा ताळेबंद आणि त्याच तारखेस संपलेल्या वर्षाचे नफा–तोटा पत्रक आणि त्याच वर्षासाठीचा संचालक मंडळाचा अहवाल सांविधानिक लेखा परीक्षकांचा अहवाल आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल स्वीकृत करणे व मंजूर करणे

(२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

कोंकण विकास महामंडळ मर्यादित करिता,

शि.वि.पाटील
व्यवस्थापकीय संचालक

नोंदणीकृत कार्यालय:

क्र.कोंविम.वासस/४३/२०१३–२०१४/३०१ दिनांक ०३.०६.२०१५

टीप: ज्या सभासदांना या सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क आहे, ते स्वत: ऐवजी एक अथवा अनेक बदली व्यक्तीस या संस्थेच्या सभेस उपस्थित राहून मतदान करण्याचा हक्क प्रदान करु शकतात व ही व्यक्ती कोंविमचा भागधारक असणे आवश्यक नाही.

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित
## संचालकांचा अहवाल
## २०१३–२०१४

प्रति,

**सभासद,**

**कोंकण विकास महामंडळ मर्यादित,**

१. कोंकण विकास महामंडळाचा ४३ वा वार्षिक अहवाल व ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे सनदी लेखापालांनी तपासलेले, महामंडळाच्या लेख्याचे विवरणपत्रक त्यांच्या अहवालासहीत सादर करताना संचालक मंडळास आनंद होत आहे.

**२.उद्दीष्टये:–** मेमोरँडम आणि आर्टिकल्स ऑफ अॅसोसिएशनमध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या महामंडळाची उद्दीष्टये कोंकणात उद्योग आणि औद्योगिकरणाची सुबत्ता स्थापना करुन त्याच्या वाढीस मदत करणे अशी आहेत. तसेच महामंडळाने` ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुगुदर्ग ह्या कोंकणच्या चार जिल्ह्याच्या विकासासाठी स्वत: अगर कंपन्या, संस्था, व्यक्ति यांच्या सहभागाने प्रकल्प हाती घेऊन त्यांचे प्रवर्तन करणे आहे.

३.**आर्थिक परिणाम:–** अहवालासंबंधीत वर्षात महामंडळाला महाराष्ट्र शासनाकडून कोणत्याही प्रकारे वित्त पुरवठा झालेला नाही. महामंडळाच्या जैविंक केंद्रामधील उत्पन्नातून आणि विविध प्रकल्पांच्या संयुक्त कंपनी स्थापनेसाठी मागविलेल्या निविदासाठी प्राप्त अनामत रक्कम यातून बँकेत ठेवलेल्या मुदत ठेंवीच्या व्याजातून महामंडळाच्या प्रशासकिय बाबींवरील खर्च भागविण्यांत येत आहे. चालू वित्तिय वर्षात लेखा विवरणपत्रानुसार महामंडळास रु.१६९५५२५/– इतका तोटा (घसारा तरतुदीसह रु.६२१३५/–) झाला आहे. एकत्रित संचित तोटा रु.१४४४९०९६८/– इतका असून तो ताळेबंद पत्रकांत पुढे ओढलेला आहे.

हे विभागीय विकास महामंडळ असल्यामुळे केवळ व्यावहारिक बाबींवर महामंडळाच्या कामकाजाचे मूल्यमापन करताना पुढील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे :–

(१)कोंकण हा अविकसित विभाग असल्यामुळे उपक्रमशीलतेचा अभाव आहे. या गुणांची जोपासना करण्याचे काम खडतर व दीर्घ मुदतीचे आहे.
(२)अविकसित विभागामुळे बाजारपेठेचा अभाव.
(३)मुंबई, पुणे व इतर मोठया शहरांत संधी उपलब्ध असल्यामुळे कुशल कामगार तेथे स्थलांतर करत असल्याने कामगारांचा अभाव.
(४)औद्योगिकरण व त्याच्या वाढीसाठी पाणी, वीज, दळणवळण, वाहतूक इत्यादी आवश्यक पूरक सोयींची कमतरता.
(५)उद्योगधंद्याचा कोंकणासारख्या अविकसित भागात विकसित भागापेक्षा जास्त असणारा गर्भवहन कालावधी.
(६)तसेच आपल्या महामंडळाकडे विकसनशील कार्यक्रम सुपुर्द केला असल्यामुळे त्यावर होणारा सततचा खर्च योग्य प्रमाणात आर्थिक फायदा किंवा उत्पन्न प्राप्त करु शकत नाही.

४. **कार्यक्रम:–** आपल्या उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी महामंडळ खालील कार्य करते:–

(i) उद्योजकांना त्यांच्या ह्या विभागांतील प्रकल्पासाठी जमीन, पाणी व वीज इत्यादी आवश्यक पूरक सोयी उपलब्ध होण्यासाठी मदत करुन उद्योगाचे प्रवर्तन करणे.
(ii) लहान उद्योजकांना राज्य शासनाच्या अनेक योजनांमधून आर्थिक मदत मिळवून देणे.
(iii) संयुक्त क्षेत्रातील कंपन्यांद्वारे स्थानिक उद्योजकांशी भागीदारी करुन उद्योजकतेसाठी आवश्यक असणारे गुण वाढविण्यास मदत करणे.
(iv) स्वत: उद्योजक बनून कोंकणाच्या नैसर्गिक साधन सपंतीचा विकास करणे.

कार्यक्रमाद्वारे आपले महामंडळ सदर विभागांतील उद्योजकतेस प्रोत्साहन देण्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करते. बेरोजगारांना, लहान उद्योजकांना व गरीबातल्या गरीब घटकांना त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत करते.

**५.उद्योजकांना सहाय्य:–**

(१)भांडवली सहभाग योजना–
या योजनेंतर्गत महामंडळाने या विभागात रु.२,०१,२३,०३०/– एवढी गुंतवणूक ४० उद्योजकांमध्ये केली.

### ६. कोविमचे प्रकल्प:–

**(अ) मीठ प्रकल्प**– महाराष्ट्र शासनाने या महामंडळास सफाळे,ता.पालघर जिल्हा ठाणे येथे १८९८ हेक्टर खार जमीन मीठ उत्पादनासाठी दिली होती. यापैकी ४७८ हेक्टर मध्ये महामंडळाने मीठ प्रकल्प कार्यान्वित केला होता. सदर प्रकल्प तोटयात चालत

होता आणि सदर जमीनी कोळंबी उत्पादनासाठी योग्य असल्याचे अहवाल प्राप्त झाल्यावर, मीठ प्रकल्प सन १९९५-९६ साली मे. किंग्ज प्रॉन लि. यांना ४७८ हेक्टर जमीन आणि मीठ प्रकल्पाची चल अणि अचल मालमत्तेसह शासन आदेशानुसार पोटभाडेतत्वावर सुपूर्द करणेत आला.

**(ब) कोविम आणि पंचम ॲक्वाकल्चर फार्म लि.यांचा संयुक्त कोळंबी उत्पादन प्रकल्पः-** महामंडळाकडील १८९८ हेक्टर खार जमीनीपैकी किंग्ज प्रॉन प्रालि. यांना दिलेल्या ४७८ हेक्टर वगळून महामंडळाला कडील १४२० हेक्टर पैकी ६०० हेक्टर खार जमीन केविम आणि पंचम ॲक्वाकल्चर फार्म लि.यांच्या कोळंबी उत्पादन संयुक्त प्रकल्पास १९९१ साली शासन आदेशानुसार पोटभाडयाने देणेत आली. या प्रकल्पांत महामंडळाचे २६% समभाग जमीनीच्या स्वरूपात आहेत. उर्वरित ७४% मध्ये २५% खाजगी प्रवर्तकाचे समभाग व ४९% खाजगी गुंतवणूकदाराचे आहेत. सदर प्रकल्पाच्या दैनंदिन कार्यात महामंडळाचा सहभाग नसून, प्रकल्पावर देखरेखीचे काम हे महामंडळ शासनातर्फे पहाते. सदर संयुक्त प्रकल्पसुरूवातीपासून तोटयांत चालत आहे. संयुक्त कंपनीने आजपर्यंत लाभांश जाहिर केलेला नाही. कोविम आणि पंचम ॲक्वाकल्चर फार्म लि.यांच्या संयुक्त प्रकल्प ६०० हेक्टर खार जमीन देऊन उर्वरित ८२० हेक्टर पैकी ४११ हेक्टर जमीन १३खाजगी उद्योजकांना कोळंबी उत्पादनासाठी शासन निर्णयनुसार पोटभाडयाने देणेत आली. उरलेल्या ४०८.७७ हे.पैकी ४०० हेक्टर खार जमीन सुरूवातीस मे कॅसल रॉक फिशरीज यांना कोळंबी उत्पादनासाठी आणि नंतर मे.सफाळे कोळंबी उत्पादन प्रकल्पासाठी शासन निर्णयाप्रमाणे पोटभाडयाने देणेत आली.

**(क) जैविक केंद्र:-** महामंडळाचा सदर प्रकल्प गट क्र.१६, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व), मुंबई.६५ येथे सन १९७६ पासून कार्यान्वित आहे. सध्या प्रकल्पांत ४७ उत्तम रक्तगटाचे वळू विर्य उत्पादनासाठी जोपासलेले आहेत.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश कोंकण आणि उर्वरित महाराष्ट्रमध्ये स्थानिक गाईनां कृत्रिमरित्या उत्कृष्ट रक्तगटांच्या वळूंचे वीर्य प्रदान करून उत्तम दुधाळ गाई निर्माण करणे हे आहे. या प्रकल्पांतर्गत गोठीत रेतमात्रा निर्मिती हे प्रमुख कार्य आहे. या प्रकल्पांतर्गत तयार झालेल्या वीर्यमात्रा महाराष्ट्र व इतर जवळचे राज्यामधील दुध महासंघ, दूध डेअरी आणि खाजगी पशुवैद्यकिय तज्ञ यांना नाममात्र शुल्क आकारून पुरविल्या जातात. या संस्था रेतमात्रा वापरून कृत्रिम गर्भ धारणेव्दारे उल्कृष्ट वंशावळीची वासरे निर्माण करतात. लेखा अहवाल संबंधी वर्षात एकूण ६१५४०५ रेतमात्रा निर्मिती करून ६१७८२९ रेतमात्रांची विक्री करणेत आली. एकूण विक्रीमध्ये मागील वर्षाच्या शिल्लक रेत मात्रांचा समावेश आहे. या महामंडळाकडे रेतमात्रा निर्मिती आणि संवर्धनासाठी आवश्यक द्रवनत्र निर्मिती यंत्रे होती. परंतु ती यंत्रे जुनी झाल्याने, महामंडळाने यापूर्वीच विक्री केली आहेत. त्यामुळे रेतमात्रा निर्मिती व संवर्धन आणि विक्री यासाठी आवश्यक द्रवनत्र स्थानिक बाजारपेठेतून दरपत्रके मागवून निम्मस्तरीय दर पुरवठादारांकडून द्रवनत्र खरेदी केले जाते. खरेदी केलेले द्रवनत्र मुख्यत: रेतमात्रा निर्मिती आणि संवधार्नासाठी वापरले जाते. उर्वरित द्रवनत्र स्थानिक खरेदरीकरांना विकले जाते. चालू वर्षी २२७४१ लिटर्स द्रवनत्र वायु स्थानिक बाजारातून खरेदी करणेत आला तसेच यावर्षी ३९९७ लि.द्रवनत्रवायु किरकोळ विक्री करणेत आला. महामंडळाला चालूवर्षी रेतमात्रा आणि द्रवनत्र विक्री तून रू. ५१५३०८९ उत्पन्न मिळाले आहे.

**(इ) तेलताड प्रकल्प:-** या महामंडळास केद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन पुरस्कृत तेलताड प्रात्यक्षिक प्रकल्प राबविण्यांचे काम सन १९८८-८९ मध्ये सोपविण्याम आले होते. महामंडळाने सिंधुदूर्ग जिल्हयांतील सावंतवाडी कुडाळ,कणकवली वैभववाडी तालुक्यातली सुमारे १००० हेक्टर जमीनीवर तेलताड झाडे लावली. या प्रकल्पास एकूण खर्च रू. १२५३.०३ लाख आला. केद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांना अनुक्रमें ५०% प्रमाणे हा खर्च करावयाचा होता. ३१ मार्च १९७८ पर्यंत महामंडळाकडे ८९६.६४ लाख केद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झाले. या प्रकल्पावर महामंडळाने १२५३.०३ लाख खर्च केला आहे. तेलताडाच्या यशस्वी लागवडीनंतर ताडांच्या पुढील मशागतीसाठी आणि पाम तेल उत्पादनासाठी सदर प्रकल्प सन १९९७-९८ मध्ये काविम आणि मे साईधाराॲग्रो प्लॅटेशन प्रा. लि. यांच्या संयुक्त कंपनीस हस्तांतर करणेत आला. या प्रकल्पातील महामंडळाचा समभाग २६% आणि खाजगी प्रकवर्तकाचा ७४% होता, परंतु महामंडळ प्रकल्पाच्या दैनंदिन कामकाजात सहभागी नव्हते. महामंडळशासनातर्फे देखरेखीचे काम पहात होते.

सदर प्रकल्प पुढे खाजगी प्रवर्तकांने व्यवस्थीत चालविला नाही. तेलताडांचे संगोपन व्यवस्थीत झाले नाही. आणि फळांपासून तेलकाढणोसाठी सुयोग्य तेलगिरणी खाजगी प्रवर्तक उभारू शकला नाही. प्रवर्तकाने जमीनीचे भाडे अदा केले नाही. स्थानीक मजूराना कामावर ठेवले नाही.यामुळे शेतकरी आणि स्थानीक जनतेने शासनाकडे मोठयाप्रमाणावर तक्रारी केल्या. त्यामुळे शासनाने चौकशी समिती नेमून आणि समितीचा अहवाल प्रवर्तकांच्या विरूध्द असल्याने खाजगी प्रवर्तका बरोबर केलेला संयुक्त कंपनीकरार रद्द केला. पुढे महामंडळाने नवीन प्रवर्तक शोधून प्रकल्प चालविण्याचा प्रयत्न केले. परंतु ते यशस्वी ठरले नाही त्यामुळे शासन आदेशानुसार शेतक-यांच्या जमीनी तेलताडासह परत करून सदर प्रकल्प सन २००३ साली बंद केला. या प्रकल्पांतर्गत जमीनी परत करणेचे काम २००६ अखेर पूर्ण करण्यांत आले.

संयुक्त कंपनी करार रद्द करणे निर्णया विरूध्द मे साईधाराॲग्रो प्लॅटेशन प्रा. लि. या खाजगी कंपनीने उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता उच्च न्यायालयाने संयुक्त करारनाम्यामधील अटी शर्तीनुसार प्रथम दावा लवादापूढे चालवावा असा आदेश देऊन

मा. श्री. राजन कोचर निवृत्त न्यायाधिश यांचे एकसदस्यीय लवाद मंडळ नेमले. लवाद मंडळाने आपला निर्णय दि.२.३.२०१० रोजी दिला. त्यानुसार महामंडळाने करार रदद करण्यासाठी खाजगी कंपनीस रू.१८,६६,८८,४८१.५३ व त्यावर १० टक्के व्याज अशी भरपाई ध्यावी असा निर्णय दिला होता. लवादाचा निर्णय महामंडळावर अन्याय कारक असल्याने लवादाच्या निर्णया विरूध्द महामंडळाने उच्च न्यायालयांत दावा दाखल केला होता. या दाव्याचा निकाल दि.२५.०२.२०१५ रोजी महामंडळाच्या बाजूने लागला उच्च न्यायालयाने लवादाचा निर्णय रद्द ठरविला आहे. तसेच नुकसानभरपाई पोटी महामंडळाने मे.साईधारा ॲग्रो प्रॉ.आणि प्लॅन्टेशन या कंपनीस रू.१८.६६ कोटी आणि त्यावरील व्याज देणेची आवश्यकता नाही असे नमुद केले आहे. सबब आनुषंगिक दायित्वामधून मे.साईधारा ॲग्रो प्रॉ.आणि प्लॅन्टेशन या कंपनीस देय नुकसानभरपाई रक्कम काढून टाकली आहे.

७. **संचालक**:– या वर्षामध्ये संचालकांची निवृत्ती अथवा नेमणूक झालेली नाही.

८. **कंपनी कायदा**, १९५६, कलम क्र.२१७ (२–अ) अन्वये जे कर्मचारी दरमहा रु.१२,००० किंवा वार्षिक रु.१,४४,००० पेक्षा जास्त मुळ वेतन मिळवितात त्यांची माहिती या अहवालात निरंक आहे.

९. **लेखा परीक्षक**:– कंपनी विधी मंडळ- भारताचे नियंत्रक आणि लेखा परिक्षण महालेखाकार, दिल्ली यांनी मे विरेन गांधी ॲन्ड कंपनी सनदी लेखापाल मुंबई यांची संविधानिक लेखापाल म्हणून सन २०१२-१३ ते २०१४-१५ या वर्षासाठी नेमणूक केलेली आहे.

१०. **कृतज्ञता**:– संचालक मंडळ, भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी महामंडळाच्या कामकाजात घेतलेल्या स्वारस्याबाबत, त्यांचे मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करीत आहे. तसेच माननीय खासदार व आमदार यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे. सचिव (उद्योग) ह्यांचे अधिकारी तसेच उद्योग आयुक्त आणि त्यांचे अधिकारी तसेच शासनाचे इतर खाती या सर्वांनी दिलेले सहकार्य, मदत आणि अमूल्य मार्गदर्शन याबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहेत. महामंडळाचे सॉलिसिटर्स मे.दिवेकर कंपनी आणि मे. लता देसाई. आणि सॉलिसिटर्स् यांनी वेळोवेळी दिलेल्या कायदेविषयक सल्ल्याबद्दल मंडळ यांचेही आभारी आहे. महामंडळाच्या विविध योजना यशस्वीरीत्या राबविण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल महामंडळ कर्मचारी वर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

**संचालक मंडळासाठी व त्याच्या वतीने,**

**व्यवस्थापकीय संचालक**

ठिकाण: मुंबई
दिनांक:

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित.

**विरेन गांधी ॲन्ड कंपनी**
**सनदी लेखापाल**
१०३ विकास कमर्शियल,
भक्ती मार्ग, मुलूंड (पू.)
मुंबई-४०० ०८०.

## स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल
## सन- २०१३-१४

**प्रति,**

**सभासद**

**कोंकण विकास महामंडळ मर्यादित**

१) आम्ही या सोबत जोडलेल्या कोंकण विकास महामंडळ मर्यादित यांचा दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद व त्याच तारखेस संपलेल्या वर्षाचे नफा - तोटा पत्रक तपासले. या ताळेबंदामधील सर्व वित्तीय बाबी व परिशिष्टमधील सर्व तपशीलांची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. आमची जबाबदारी या वित्तिय बाबी व परिशिष्ट यांच्यावरील लेखापरीक्षणांवर आधारीत आमचे मत नमूद करणे आहे.

२) भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्विकृत असलेल्या लेखापरीक्षण मानदंडाप्रमाणे आम्ही लेखा परीक्षण केले आहे. या लेखापरीक्षण मानदंडाप्रमाणे वित्तीय बाबी व परीशिष्ट, ही जास्तीत जास्त अचूक व चुकीची नाही, हे आम्ही कंपनी व्यवस्थापनाकडून आश्वासीत करून घेत असतो. लेखापरीक्षणांमध्ये खर्चाची कागदपत्रे तपासणे, तसेच लेख्यांमध्ये कंपनी व्यवस्थापनाने दिलेल्या टिपण्यांचा आधार घेणे, इत्यादि बाबींचा समावेश आहे. तसेच लेखापरीक्षणांमध्ये कंपनी व्यवस्थापनाने सर्वसाधारण लेखापध्दतीचा अवलंब केला आहे.कि नाही, हे तपासणे याचा समावेश असतो. लेखा परीक्षणामध्ये आम्ही योग्य मते नोंद दिली आहेत, याचा आम्हांला विश्वास आहे.

३) केंद्र सरकारच्या कंपनी व्यवहार विभागाने निर्गमित केलेल्या "कंपनी लेखा परीक्षण " आदेश २००३ मधील कंपनी कायदा आदेश आणि त्या मधील आदेश २००४ मधील सुधारणा, १९५६ मधील कलम क्र.२२७(४अ) च्या पोट कलम क्र.४ व ५ प्रमाणे आवश्यक असलेले परीशिष्ट 'अ' सोबत जोडले आहे.

४) आम्ही खालीलप्रमाणे मते नोंदवित आहोत.

**अ)** लेखा परिक्षणामध्ये नमूद किरकोळ ऋणको, किरकोळ धणको, कर्ज, चालू दायित्व, अग्रीम ठेवी, कर्मचा-यांकडील अग्रीम आणि धनको या संबंधीत संस्था, व्यक्ती कडून खातर जमा केलेली नाही. अथवा सुंसंगती लावलेली नाही. या स्थितीमध्ये पुराव्या अभावी आणि माहिती अभावी लेखाबुकामध्ये जुळणी करणे (Adjustments) अनिश्चित आहे. ( टिप्पणी क्र. ३५ जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे, त्याचे अवलोकन करावे.

**ब**) परिक्षण चालू असलेल्या संबंधित वर्षाचे लेखा परिक्षण बराच कालावधी होउन गेल्यानंतर होत असल्याने, ज्या मुदत ठेवी लेखा परिक्षणापुर्वी नियत मुदत संपल्याने जमा केल्या, त्यांची मुळ प्रत तपासणीसाठी लेखा परिक्षण दरम्यान उपलब्ध नव्हती.

क) या महामंडळाच्या वित्तिय अहवालामध्ये मालमत्ता विभागामध्ये अनेक साहित्य, वस्तू, मत्ता आणि खाली निर्देशित केलेले दायित्व, लेखा बुकांत गेली कित्येक वर्षे नमुद आहेत. या दायित्वामध्ये घेतलेले कर्ज, दिलेले कर्ज चालू मत्ता दायित्व आणि वर्तमान मत्ता ईत्यादींचा समावेश आहे यामधील ब-याच मत्तांचा हिशेब टिप्पणीमध्ये कंपनी व्यवस्थापनाने समावेश केला असून, त्या या वित्तिय अहवालाचा एक भाग झालेला आहे. कंपनीचे लेखापरिक्षणादरम्यान भरपूर कालावधी व्यतित झालेला असल्याने, लेखापरिक्षणादरम्यान कंपनीकडे या संबधीची कागदपत्रे उपलब्ध नव्हती, परिणामी या मत्तांची पडताळणी करणे शक्य झालेले नसुन, कंपनीने हीशेब टिप्पणीमध्ये केलेले तपशिल स्विकारून परिक्षण पूर्ण करणेत आले आहे. या मत्तांची पडताळणी व्यवस्थापनाने पुरविलेल्या तपशिलानुसार करणेत आल्याची बाब ठळकपणे नमुद करणेत आली आहे. अशारितीने या मत्तांच्या पडताळणीबाबत टिप्पणी करण्यास असमर्थ असल्याने (खालील परिशिष्टामधील उल्लेख केलेल्या बाबी , त्याची माहिती व्यवस्थापनाने दिलेली असल्याने) या मत्ता चालु वर्षाच्या ताळेबंदामध्ये मागील वर्षाप्रमाणे समाविष्ट आहेत. या बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे. ( )

(i). असुरक्षित दिर्घ मुदतीची कर्जे ( टिप्पणी क्र. ४ (ब ) जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे, त्याचे अवलोकन करावे.

(ii). किरकोळ ऋणको कडील रक्कम रू.२२,६८,०८८/-( टिप्पणी क्र. ५ (ii ), (iii ) आणि (iv )जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे, त्याचे अवलोकन करावे.)

**(iii).** इतर वर्तमान दायित्व ( टिप्पणी क्र. ६ जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे, त्याचे अवलोकन करावे.)

**(iv)** गुंतवणूक ( टिप्पणी क्र. ८ जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे, त्याचे अवलोकन करावे.)

**(v)** कर्ज आणि अग्रिम ज्या खरेदीदार/पुरवठादार आणि ठेवी संबधी ( टिप्पणी क्र. १२ (अ) आणि (ड) जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे त्याचे अवलोकन करावे.)

**(vi)** इतरांना दिलेली कर्ज आणि अग्रिमा रक्कमा रू.३,२४,६७,७०१/- ( टिप्पणी क्र. १२ (ब) जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे त्याचे अवलोकन करावे.)

**(vii)** व्यापार विक्रीतून संशयास्पद येणे बाकी ( टिप्पणी क्र. १० (ब) जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे त्याचे अवलोकन करावे.)

**ड.** तसेच कंपनीचे लेखापरिक्षण भरपुर व्यपगत कालावधीनंतर होत असल्याने दि. ३१.३.२०१४ रोजी वस्तुसूचीमध्ये समाविष्ट बाबी आणि स्थीर मत्तेची पडताळणी शक्य झालेली नाही.

**इ.** तसेच लेखाबूकांमध्ये नोंद असल्यानुसार रू.७३००/- चा धनादेश, जो विणा नगर को.ऑ.हा. सोसायटीमधील सदनिकेच्या भाडेसाठी प्राप्त झाला आहे, तो बॅकेत सादर झाला, परंतू डिसेंबर, २०१२ पासुन वटलेला नाही. सदर धनादेश बँकेकडून गहाळ झाल्याचे नमुद आहे. या धनादेशासाठी लेखाबूकातील नोंद काढून टाकून, लेखाबूक परिपूर्ण करणे आहे.

फ. या कंपनीने खालील बाबींसाठी लेखा पुस्तकात नोंद केलेली नाही.

**(i)** कंपनी उपदान कायदा १९७२ नुसार कर्मचा-याना देय संभाव्य उपदानासाठी जी रक्कम रू.,३५६८३६४/- होत आहे, त्यासाठी तरतूद केलेली नाही ( गतवर्षी ही रक्कम रू.३३८४,०८७/-होती) ( टिप्पणी क्र.१० (ब) जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे त्याचे अवलोकन करावे).

**(ii)** या कंपनीच्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरण दायीत्वाची रक्कम अनिश्चीत आहे. (पहा वित्तिय अहवालाची टिप.क्र.२१ )

**(iii)** समभागामधील संशयास्पद वसूली प्राप्त गुंतवणूकीसाठी येणारी तूट आणि चिपळूण पावरलूम विणकर सह लो. ला दिलेली अग्रीम रक्कम अनुक्रमें रू.२,००,०२५ आणि रू.५,३४,५२२ साठी तरतूद केलेली नाही (पहा वित्तिय अहवालाची टिप.क्र.२३ ).

**(iv)** कंपनीने इतर मत्तेसाठी " वैधता परिक्षण " (Impairment test) लेखा परिक्षण मानांकण २८ च्या नुसार मत्तेची वैधता नुसार केलेले नसल्याने त्यावर आधारीत मत्तेच्या मुल्याकंना मधील -हास ठरविणे अनिश्चित झाले आहे(पहा वित्तिय अहवालाची टिप.क्र.७ )

**(v)** या कंपनीने दुय्यम कंपन्याच्या समभाग अणि निवडक शेअर मधील केलेली गुंतवणूक रू.४९,३५,६००/- आणि २,५०,०००/- मिळून एकत्रित गुंतवणूक ५१,८५,६००/- आणि दुय्यम कंपन्यांना दिलेली अग्रीम आणि कर्जे यांची एकत्रित बेरीज रू.५३,४४९,२१२ (पहा वित्तिय अहवालाची टिप.क्र.२५ )या गुंतवणूकीच्या संभाव्य तोटयासाठी तरतूद केलेली नाही. वर उल्लेख केलेल्या गुंतवणूकीमध्ये रू.२४,३५,०००/- आणि २,५०,०००/- आणि ४२,६८३,४६६ या मे.सहयाद्री ग्लास वर्क्सच्या समभाग, निवडक शेअरमध्ये गुंतविलेल्या आणि सहयाद्रीला दिलेल्या कर्ज आणि अग्रीमचा समावेश आहे. मे.सहयाद्री ग्लास वर्क्स ही बीआयएफआर च्या आदेशानुसार समापनांत आहे. मे.सहयाद्री ग्लास वर्क्स लि. च्या समापकानी चल,अचल मत्ता हिची विल्हेवाट लावली आहे. परंतु महामंडळाला समापकाकडून मत्ता विक्रीतून आलेल्या रक्कमेपैकी काहीही रक्कम मिळाली नाही. कंपनी रजिष्ट्रार यांनी उरलेल्या,३ दुय्यम कंपनीची नांवे कंपनी बुकातून काढून टाकली आहेत.

**(vi)** ऋणकोकडील थकबाकी येणी रू.३८,२०,७७६/- आणि संशयित कर्ज आणि अग्रीम (उपकंपन्यांकडील येणे वगळता) रू. ४७,९२,६६०/- एकत्रित रक्कम रू.८६,१३,४३६/-खर्च तरतूद केलेली नाही. (पहा वित्तिय अहवालाची टिप.क्र.२८ ) वरील संशयित येणीमध्ये महाराष्ट्र स्टेट को ऑ.फर्टीलाइझर लि. यांचे कडील रू.१४,४६,५२५/- आणि महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी बोर्ड यांचेकडील रू.१३,३६,१५१/-या रकमेचा समावेश आहे.

**(vii)** या कंपनीने कांही वर्षापूर्वी बंद पडलेल्या जहाज तोडणी प्रकल्पामधील गुंतवणूक रू.१९,२३,०८२/- लेखाबुकांतून काढून टाकलेली नाही. (पहा वित्तिय अहवालाची टिप.क्र.३० )

**(viii)** बँक ऑफ कराडमध्ये गुंतविलेल्या रू. १.०० कोटीसाठी लेखाबुकात तरतूद केलेली नाही. हि बॅक समापनामध्ये आहे. (पहा वित्तिय अहवालाची टिप.क्र.२६ )

वर नमूद केल्याप्रमाणे आणि इतर जमेस न धरलेले तोटे वगळतां ,कंपनीने रू.८३४७४२४१/- एकत्रित तोटयासाठी लेखाबुकांत तरतूद केलेली नाही. ज्यामध्ये उपदान, चाल भांडवली कामावरील -हास, मुदत ठेवी वरील संशयित येणी आणि गुंतवणूकमधील मुल्यांकनावरील -हास, कर्ज, अग्रीम , आणि येणी याचा समावेश आहे.

**ग.** कंपनी निबंधक कार्यालयाच्या वेबसाईटमधील संशोधनामधुन प्राप्त माहितीप्रमाणे महामंडळाने गुंतवणूक केलेल्या कंपन्यांची स्थीती (जी माहिती या वित्तिय अहवालाचा भाग असलेल्या टिप्पणी क्र.८ खाली नमूद केली आहे).

| **कंपनीचे नांव** | **गुंतवलेली रक्कम** | **एम.सी.ए. प्रमाणे कंपनीची स्थीती** |
|---|---|---|
| कोंकण सी. फूडस लि. | १९९९२०० | नाव काढून टाकले आहे |
| कोंकण दुग्ध विकास महामंडळ (अ) | २५०७०० | नाव काढून टाकले आहे |
| कोंकाण क्रिस्टल सॉल्ट् ॲण्ड मरीन केमिकल्स लि. | २५०७०० | नाव काढून टाकले आहे |
| सह्याद्री ग्लास वर्क्स लि. | २४३५००० | निष्क्रीय |
| साई धारा डीसीके ॲग्रो प्रॉडक्ट व प्लॅन्टेशन लि. | १२६८३०० | निष्क्रीय |
| प्रेसिशन ज्युवेल्स लि. | १६०००० | परिसमापनात आहे |
| रेवा ड्रग्ज ॲण्ड केमिकल्स लि. | ३००००० | निष्क्रीय |
| वेस्ट एंड बॉबीन्स प्रा.लि. | १००,००० | नाव काढून टाकले आहे |
| अनंत मरीन सर्व्हिसेस लि. | ९७००० | इ.फायलींगसाठी उपलब्ध नाही |
| मे. फेअर लेदर इंड. लि. | ३००००० | इ.फायलींगसाठी उपलब्ध नाही |
| अगस्ती यिस्ट ॲण्ड केमिकल्स प्रा.लि. | ४८००० | निष्क्रीय |
| राजसूत पॅकेजिंग प्रा. लि. | १७०००० | निष्क्रीय |
| कोंकण ब्रीक्स प्रा. लि. | १३५००० | निष्क्रीय |
| पायोनियर शीप ब्रेकर्स प्रा.लि. | ९८७८० | निष्क्रीय |
| सुकेतू कोंकण शीप ब्रेकर्स प्रा.लि. | ९८८०० | निष्क्रीय |
| साई धारा डीसीके ॲग्रो प्रॉडक्ट व प्लॅन्टेशन लि. | ५४९६५०० | निष्क्रीय |
| सह्याद्री ग्लास वर्क्स लि. | २५०००० | निष्क्रीय |
| डेक्कन प्लास्टी–केम प्रा. लि. | २२५००० | निष्क्रीय |
| प्रेसिजन ज्युवेल्स लि. | २४०००० | परिसमापनात आहे |
| जावा इंजि. इंडिया प्रा. लि. (देसाई ॲण्ड कं. मेटल इंड प्रा. लि.) | ९९००० | नाव काढून टाकले आहे |
| सरौगी प्लास्टीक इंड. प्रा. लि. | १४९००० | निष्क्रीय |
| नुरु लॅमिनेटर्स ॲण्ड केमिकल्स पॅकोजिंग प्रा. लि. | ८७००० | निष्क्रीय |
| वेस्टर्न इंडिया ज्युट लॅमिनेटर्स प्रा.लि. | ८६००० | निष्क्रीय |
| निखिल पॅकेजिंग प्रा. लि. | १००००० | निष्क्रीय |
| शेष इंजिनिअरिंग प्रा. लि. | ९६००० | परिसमापनात आहे |
| आदित्य ड्रग हाऊस प्रा. लि. | ९८००० | नाव काढून टाकले आहे |
| ॲलासन पल्प ॲन्ड पेपर्स लि. | ५००००० | नाव काढून टाकले आहे |
| **एकूण** | **१५१३७९८०** | |

वरील प्रमाणे अवलोकीत गुंतवणूकीच्या मूल्याकंन -हासासाठी तरतूद केलेली नाही.

**ह.** तसेच कंपनीने कुठलेही कर भरलेले नाहीत जे विहित कायदयानुसार आवश्यक आहेत जसे आयकर आणि विक्रीकर त्यामुळे या संबधी कंपनीचे काही दायित्व असल्यास त्याची निश्चिती करणे शक्य झालेले नाही.

**५)** *सदर अहवाल योग्य करून सादर करण्यापूर्वी आम्ही वित्तिय अहवालाचा भाग असलेल्या वित्तिय अहवालाची टिप.क्र.४३ कडे लक्ष वेधू इच्छीतो त्यानुसार कंपनीने प्रचलित लेखा पध्दतीनुसार मागील वर्षीच्या थकीत रक्कम रू. ७६३१८/-करितां ३१.३.२०१४ च्या स्थितीनुसार कंपनीने परवाना आकार आणि पाणीपट्टी माहे डिसेंबर २०१३ साठीची विवादास्पद असल्याने भरलेली नाही. सबब लेखाबूकात तरतूद केलेली नाही.

**६)** कंपनीने शहापूर येथील लघु औद्योगिक वसाहतीमधील गाळयांची भाडेपट्टा प्राप्त रक्कमेची विभागणी उत्पन्न आणि अग्रीम भाडेपट्टा अशी केलेली नाही. सदर रक्कम रू.७२०००/- आहे सदर रक्कम उत्पन्न म्हणून दाखविली आहे. हे उत्पन्न यावर्षी रोख उत्पन्न असे आहे ते तंतोतंत स्थितीवर नाही.

**७)** या कंपनीने चालू गृहितावर आधारीत मार्च ३१.३.२०१४ ला संपलेल्या आर्थीक वर्षासाठी वित्तिय अहवाल तयार केला आहे. परंतु कंपनीच्या जमा शिलके`चा पूर्ण -हास झालेला असल्याने ( जरी मागील वर्षी कंपनी फायद्यांत असली तरी )

हि कंपनी वर्षानूवर्ष तोटयांत चालत असल्याने आणि वर्तमानांत या परिस्थीतीत आर्थिक स्त्रोत/मदत मिळण्याची शक्यता मुख्य व्यवसाय बंद झाल्याने सुधारणा होण्याची शक्यता अत्यंत धुसर आहे. वरील वस्तुस्थीती आणि लेख्यांवरील टिपण्णीमध्ये नमूद केलेल्या बाबी लक्षांत घेता, कंपनी सुस्थीतीत चालेल या विषयी अनिश्चतता जाणवते. तसेच कंपनी आपली मालमत्ता विकून देणी पूर्ण करू शकेल असे वाटत नाही. त्यामुळे कंपनीची नोंद झालेली मालमत्ता आणि देणी यासाठी तरतूद आवश्यक आहे. कंपनीच्या आर्थीक अहवाल आणि नोंदीमध्ये या बाबींचा समावेश नाही.

८) आमचा अहवाल योग्य त्या दष्टीने पूर्ण करणे आधी अनुसूची २० मधील टिपण्णी क्र.३८ कडे लक्ष वेधू इच्छीतो. त्यानुसार या कंपनीने एमआयडीसी रत्नागिरी विभागाला कंपनीने सदनिका हस्तांतर केले आहे. या विषयी कंपनीकडे सध्या माहिती उपलब्ध नाही. परंतू या सदनिकांचा लेखाबुकामधील स्थिर मत्तेमधील समावेश लक्षांत घेता, कंपनीने नफा, तोटा पत्रकामध्ये या सदनिकेंचा -हास यांचा समावेश ३१.३.२०१४ रोजी संपत असलेल्या पत्रकांत केला आहे.

९) आम्ही वर उल्लेख केलेल्या परिच्छेदातील आणि जोडपत्रामधील परिच्छेद ३ वरील टिपण्णी बाबी व्यतिरिक्त खालील तपशिल देऊ इच्छितो.

**अ.** लेखा परिक्षणासंबधीत वर्ष २२०१३-१४ दरम्यानच्या झालेल्या उलाढालीची परिक्षणासाठी सर्व आवश्यक माहिती, तपशिल आणि स्पष्टीकरण आम्हांला आमच्या माहितीनुसार प्राप्त झाले आहे याची खात्री वाटते.

**ब.** कंपनीने प्रचलित कायद्यानुसार आवश्यक ती लेखाबुके/लेखा पध्दत अवलंबलेली आहेत, हे कंपनी कडील लेखा बुकांच्या परिक्षणाकरून दिसून येत आहे.

**क.** कंपनीचा ताळेबंद आणि नफा - तोटा पत्रक हे लेखा बुकांमधील नोंदीवर आधारीत आहे.

**ड.** आमच्या मते खालील बाबी या प्रचलित लेखा परिक्षण पध्दती नुसार नाहीत.

i ) भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या कडून प्रकल्पासाठी आणि भांडवली मत्ता म्हणून मिळालेले अनुदान निधी यांची नोद भारतीय लेखा मापदंड १२ नुसार "शासकीय निधी लेखा हिशोब " ची एकत्रिक बेरीज रू.४३,४०,४१५/- होत आहे. प्रकल्प, भांडवली मत्तेतून वजा करता शिल्लक आणि अतिरिक्त (परीशिष्ट २) शिर्षकाखाली दाखविणे योग्य राहिले असते.

ii) लाभांश, व्याज यापासून मिळणारे उत्पन्न ( मुदत ठेवीवरील व्याज वगळून ) आणि कराड बॅंकेतील गुंतवणूक वगळून आणि भाडे व सेवाकर याची वेगळी नोंद लेखा मापदंड १ नुसार रोखीच्या स्वरूपात " प्रकट लेखा धोरणे" या शिर्षखाली पाहिजे होते. आणि ते तंतोतंत पध्दतीवर काढणे योग्य नव्हते.

iii) समभागावर केलेल्या गुंतवणूकीचे मुल्यांकन हे अश्या किंमतीवरआधारीत आहे की त्यामध्ये त्यांच्या किंमतीमधील तूट गृहीत धरलेली नसून ते तत्कालीन किंमतीवर आधारीत आहे हि तूट लेखा बुकांत नमूद गुंतवणूकीच्या किंमतीमध्ये गृहीत धरलेली नाही, जे लेखा परिक्षण मानदंड १३ नुसार " गुंतवणूकीचा लेखा हिशोब " पाहिजे होते.

iv) लेखापरिक्षण मानांकन-२२ " उत्पन्नावरील करांचे लेखे "

**इ)** ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक ज्याचा या अहवालामध्ये उल्लेख आहे ते प्रचलित लेखा परिक्षण मानांकनाच्या कायद्यामधील २११ विभाग याच्या ३ सी उपविभागानुसार केलेले आहे.

**फ)** या कंपनीच्या संचालकांचे लेखी निवेदन दि. ३१.३.२०१४ चे उपलब्ध नसल्याने, कायदा २७४ चा उपकायदा (१) च्या कलम (जी ) नुसार दि. ३१.३.२०१४ रोजी नियुक्त संचालकांपैकी एखादया संचालकाची नियुक्ती अयोग्य असल्याविषयी भाष्य करतां येत नाही. तसेच आमच्यामते आणि आम्हालां देण्यांत आलेल्या मााहिती आणि स्पष्टीकरणानुसार आणि आमची टिप्पणी ४,६,७,८ आणि १०(ड)ला मर्यादित ठेवून वरील लेखा परिक्षणे आणि त्यावरील टिप्पणी यामध्ये सर्व मााहिती स्पष्टीकरण भारतामधील प्रचलीत आणि स्वीकृत लेखा परिक्षण तत्वानुसार या कंपनीच्या लेख्यांवर योग्य आणि समाधानकारक भाष्य करण्यात आले आहे.

१) कंपनीचा दि.३१ मार्च २०१४ वस्तुस्थीतीवर आधारीत ताळेबंद तयार केला आहे.

२) कंपनीचा चालू वर्षीचा तोटा हा कंपनीच्या नफा तोटा पत्रकानुसार आहे.

**विरेन गांधी ॲन्ड कंपनी**
**सनदी लेखापाल**
**संस्था नों.क्र.१११५५८ डब्ल्यु**

**चिंतन वि. गांधी**
**भागीदार**
नं.१३७०७९

ठिकाण: **मुंबई**
दि.: १८.०४.२०१५

**विरेन गांधी ॲन्ड कंपनी**
**सनदी लेखापाल**

**लेखापरिक्षण अहवालाचे जोडपत्र**

**दि.३१/३/२०१४ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तिय अहवालाचा आमच्या लेखापरिक्षण अहवाला सोबतचे परिशिष्ट याच लेखापरिक्षण अहवालाचा परिच्छेद ३ ला अनुसरून**

---

**१) स्थावर मत्ते संबंधी :**

**अ)** कंपनी व्यवस्थापनाने स्थीर मत्तेची योग्य नोंद, नोंद बुकांत ठेवलेली नाही. तसेच स्थिरमत्तेची संख्या, आणि इतर माहिती, स्थिती तसेच ठिकाणांचा उल्लेख याची माहिती ठेवलेली नाही.

**ब)** चालू वर्षी कंपनी व्यवस्थापनाने स्थीरमत्तेची पडताळणी केलेली नाही. त्यामुळे स्थीरमत्तेचा घसारा मागील वर्षाच्या अहवालामधील घसारा किंमतीनुसार केलेला आहे. स्थीरमत्तेच्या नोंदबुका अभावी स्थीरमत्तेची संख्या जनरल लेजरमधील नोंदी प्रमाणे आहेत कि नाही, यावर भाष्य करतां येत नाही. तसेच सध्याची स्थीर मत्ता संख्या आणि जनरल बूकांतील नोंद यामध्ये त्रुटी आहेत याची पडताळणी करता आलेली नाही.

**क)** आम्हाला प्राप्त माहितीनुसार चालू वर्षी कंपनीने आपल्या स्थीरमालमत्तेपैकी भरीव मत्ता चालू वर्षी विकलेली नाही.

२) भांडार विषयी :

**अ)** अहवाल वर्षामध्ये कंपनी व्यवस्थापनाने शिल्लक मालाची प्रत्यक्ष पडताळणी केलेली आहे.

**ब)** नोंदवही उपलब्धते अभावी शिल्लक मालाची संख्या, पडताळणी आणि त्यावरील टिपण्णी या विषयी भाष्य करतां येत नाही.

**क)** आम्हाला प्राप्त माहिती आणि स्पष्टीकरणाविषयी कंपनीने भांडार विषयी नौंदी ठेवलेल्या नाहीत त्यामुळे त्या मधील त्रूटी,नोंद बुकामधील नोंदी याविषयी भाष्य करतां येत नाही.

**३)** कंपनीने सुरक्षित किंवा असुरक्षित मंजूर किंवा घेतलेली कर्जे यांच्या नोंदी कायदा कलम ३०१ नुसार नोंद बुकांत घेतल्या आहेत.

**अ)** आम्हाला प्राप्त माहिती आणि स्पष्टीकरणानुसार या कंपनीने आपल्या ४ दुय्यम कंपन्यानां बिनव्याजी व असुरक्षित कर्ज वितरीत केले आहे. यांची नोंद यु/ एस ३०१ मध्ये केली आहे. या वर्षा अखेर एकूण वितरीत केलेले थकीत रक्कम रू.५३,४४९,२१२/- होत आहे.

**ब)** आम्हाला प्राप्त माहिती नुसार आणि स्पष्टीकरणानुसार आणि टिप्पणी क्र. २५ जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे मधील वस्तुस्थितीचे अवलोकन करता हया कर्जा वरील व्याजदर हा कंपनीच्या हिताला बाधक आहे.

**क)** आम्हाला प्राप्त माहिती नुसार आणि स्पष्टीकरणानुसार आणि टिप्पणी क्र. २५ जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे मध्ये नोंदविलेल्या मतानुसार या कर्जाची परतफेड आणि व्याज भरणा यामध्ये नियमितता आढळून आली नाही.

**ड)** आम्हाला प्राप्त माहिती नुसार आणि स्पष्टीकरणानुसार आणि टिप्पणी क्र.२५ जो या वित्तिय अहवालाचा भाग आहे मध्ये नोंदविलेल्या मतानुसार वरील कर्जे मुदतीपेक्षा जास्त काळ प्रलंबित आहेत.तसेच कंपनीने ही कर्जे वसूलीसाठी उचलेली पावले समर्थनीय नाहीत.

**इ)** या महामंडळाने महाराष्ट्र शासनाकडून असुरक्षित बिनव्याजी कर्ज, घेतले आहे. सभासदाची नोंद कलम कायदा ३०१ अंतर्गत नोंद बुकांत ठेवली आहे. या वर्षाच्या शेवटी अश्या कर्जाची जास्तीत जास्त कमाल थकीत रक्कम रू.५९,२४३,६२०/- होत आहे.

**फ)** आम्हाला प्राप्त स्पष्टीकरणाप्रमाणे, आमच्या मते कंपनीच्या उपरोक्त निर्देशित कर्जाच्या अटी व शर्ती कंपनीच्या हिताला बाधक नाहीत.

**ग)** हे महामंडळ महाराष्ट्र शासनाकडून घेतलेल्या असुरक्षित कर्जाच्या परत फेडी बाबत अनियमित आहे.

**४)** आम्हाला प्राप्त स्पष्टीकरणाप्रमाणे, आमच्या मते कंपनीच्या व्यवहाराचे स्वरुप आणि आर्थिक उलाढाल लक्षांत घेतां स्थिर मत्ता, कच्चामाल, यंत्रसामुग्री, उपकरणे व इतर मत्ता खरेदी साठी अंतर्गत नियंत्रण पध्दतीचा समाधानकारक अवलंबकेला आहे. आमच्या लेख परिक्षणांच्या कालावधीत अंतर्गत नियंत्रण पध्दतीमध्ये मोठया प्रमाणावर कमतरता आढळून आली नाही.

**५)** कायदा कलम ३०१ च्या नुसार कंत्राट किंवा व्यवस्थेविषयी

**अ)** आम्हाला प्राप्त माहितीनुसार कंपनीने कायदा कलम ३०१, नुसार आवश्यक सांविधानिक नोंद बुके ठेवलेली नसल्याने, कंत्राटी तपशिल नोंद यासंबंधी भाष्य करणे शक्य नाही.

**ब)** आम्हाला प्राप्त माहितीनुसार आणि स्पष्टीकरणांनुसार कंपनीने कायदा कलम ३०१, नुसार आवश्यक सांविधानिक नोंद बुकात नोंद करणे व्यव्हार किंवा कंत्राट दिलेले नसल्याने, आदेश कलम ४ (V) (ब) या कंपनीला लागू होत नाहीत.

**६)** आमच्या मते आम्हाला प्राप्त माहिती आणि स्पष्टीकाणानुसार कंपनीने कंपनी कयदा कलम ५८ अ आणि ५८अअ व त्यावरील नियमानुसार जनतेकडून कोणत्याही प्रकारच्या ठेवी कंपनीने स्विकारल्या नाहीत त्यामुळे आदेशाच्या नियम ४ (vi) च्या नोंदी ठेवणे बंधनकारक नाही.

**७)** कंपनीकडे त्यांची स्वत:ची अंतर्गत हिशेब तपासणी पध्दत नाही.

**८)** आम्हांला दिलेल्या स्पष्टीकरण आणि माहितीनुसार केंद्र सरकारने कंपनी कायदा १९५६ च्या कलम २०९(१) अंतर्गत कंपनीचा कोणत्याही उत्पादनाच्या मूल्याचे/किंमतीचे तपशील ठेवणे बंधनकारक केलेले नाही,

**९)** सांविधानिक देणी विषयी

अ) कंपनी: विवादीत देणी सांविधानिक देणी अदा करणेबाबतीत नियमित आहे. या देण्यामध्ये भ.नि.निधी, सेवाकर, इतर कामगार नियमानुसार यांचा समावेश आहे. चालू वर्षामधील उपरोक्त निर्देशित देण्यांपैकी कुठलीहल देणी प्रलंबित नाहीत. या आर्थिक वर्षाच्या नियमानुसार देय दिवसापासुन सहा महिनेपर्यंत कसल्याही सांविधानिक देणींची थकबाकी नाही. जरी या कंपनीने राजकोषीय अधिनियमाचे पालन केलेले नसलेतरीही.

ब) आम्हाला प्राप्त माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार खालील नमूद प्राप्तीकर वगळता या कंपनीकडे सांविधानिक देणी,कर,थकीत नाही किंवा देणी विषयी विवाद संबंधीत अधिका-यामुळे सुणावणी सुरू नाही.

| सांविधानिक विषयी | कराचे विश्लेषण | थकबाकी | कालावधी | सुनावणी सुरू असलेली |
|---|---|---|---|---|
| आयकर कायदा १९६१ | आयकर | रू.१५,४००/- | माहिती उपलब्ध नाही. | माहिती नाही. |

१०) आम्हाला प्राप्त माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार खालील या वर्ष अखेरीचा कंपनीचा संचित तोटा रू.१४४४९०९६८/- हा कंपनीच्या एकूण मालमत्तेच्या एकूण मुल्यांच्या ५०% पेक्षा जास्त आहे. या कंपनीची चालूवर्षी रू.१६३३३९०/- रोकड तुट आलेली आहे.

११) आम्हाला प्राप्त माहिती आणि दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार कंपनीने लेखाबुकांनुसार या कंपनीने कुठल्याही बँका किंवा वित्तिय संस्थाकडूनकर्ज घेतलेले नाही किंवा ऋणपत्रे यांचे जारी केलेले नाही. त्यामुळे कंपनी आदेशच्या नियम ४ (११) चे पालन बंधनकारक नाही.

१२) आम्हाला प्राप्त माहिती आणि दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार या कंपनीने समभाग / ऋणपत्रे जामीन/ तारण ठेवून दुस-या कंपनीना कर्ज/ अग्रीम दिलेल्या नाहीत. त्यामुळे कंपनी आदेशच्या कलम ४(१२) लागू होत नाही.

१३) आमच्या मते सदर कंपनी चिटफंड / निधी अथवा म्युच्युअल बेनिफिट फंड किंवा संस्था नाही. त्यामुळे कंपनी आदेशच्या कलम ४(१३) लागू होत नाही.

१४) आम्हाला प्राप्त स्पष्टीकरणांनुसार ही कंपनी समभाग, रोखे,तारण किंवा इतर तत्सम गुंतवणूकीचे व्यवहार करत नाही. त्यामुळे आदेश मधील कलम ४(१४) लागू होत नाही.

१५) बँक अथवा वित्तीय संस्थाकडून वेगवेगळया कंपन्यानी / संस्थानी घेतलेल्या एकूण रू.१,६६,८६,२००/- एवढया कर्जासाठी कंपनीने हमी दिली आहे. परंतु याबाबत अद्यायावत माहिती अभावी सदर कर्जाच्या अटी व शर्ती कंपनी हितासाठी बाधक आहेत किंवा कसे याबाबत भाष्य करतां येणार नाही.

१६) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार अहवाल वर्षाच्या कालावधीत किंवा मागील वर्षी कंपनीला अल्प मुदतीचे कर्ज प्राप्त झालेले नाही. त्यामुळे उपभोगीता माहिती देणी बंधनकारक नाही.

१७) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि लेखा बुके तपासणी नंतर असे दिसून येते कि, कंपनीने अल्प मुदतीचे कर्ज, उभारणी केलेली नाही त्यामुळे उपभोगी तपशिल सादर करणे बंधनकारक नाही

१८) आम्हाला प्राप्त माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार कंपनीने कायदा कलम ३०१ नुसार आवश्यक रजिष्टरमध्ये नोंद करणेसाठी आवश्यक शेअर वाटप चालू वर्षी केलेले नाही. त्यामुळे कलम ४ (१८) ची अंमलबजावणी कंपनी देणे बंधनकारक नाही.

१९) अहवाल वर्षाच्या कालावधीत या कंपनीने कोणतेही रोखे निर्गमित केलेले नसल्याने, कंपनीच्या कलम ४ (१९) माहिती देणे बंधनकारक नाही.

२०) अहवाल वर्षाच्या कालावधीत कंपनीने जाहिर रित्या समभागाव्दारे निधी उभा केलेला नाही. त्यामुळे कंपनी कायदाच्या कलम ४ (२०) नुसार माहिती देणे बंधनकारक नाही.

२१) कंपनीने पुरविलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार व लेखाबुके तपासणी केल्यानुसार अहवाल वर्षामध्ये कंपनीमध्ये अफरातफरची प्रकरणे आमच्या नजरेत आलेली नाहीत किंवा आमच्या निदर्शनास आणलेली नाहीत.

**विरेन गांधी ॲन्ड कंपनी**
**सनदी लेखापाल**
**संस्था नों.क्र.१११५५८ डब्ल्यु**

**चिंतन वि. गांधी**
**भागीदार**
स.नं.१३७०७९

ठिकाणः **मुंबई**
दि.: १८.०४.२०१५

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित
## दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंतचा ताळेबंद

| | टिपा | ३१ मार्च २०१४ रोजी रुपय | ३१ मार्च २०१३ रोजी रुपय |
|---|---|---|---|
| १ **समभाग आणि दायित्व** | | | |
| भागधारकांचा निधी | | | |
| भाग भांडवल | २ | ८८०९९६०० | ८८०९९६०० |
| राखीव निधी व शिल्लक | ३ | (१४०१५०५५३) | (१३८४५५०२८) |
| | | **(५२०५०९५३)** | **(५०३५५४२८)** |
| **समभाग मिळणेसाठीचा थकीत निधी** | | | |
| अप्रचलित दायित्व | | | |
| दिर्घ मुदतीचे कर्ज | ४ | ५९२४३६२० | ५९२४३६२० |
| | | **५९२४३६२०** | **५९२४३६२०** |
| **प्रचलित दायित्व** | | | |
| व्यापार देणी | ५ | ४३१२८४३ | ३८०२६४० |
| इतर प्रचलित दायित्व | ६ | १५६३८४०४८ | १५६३८०२७९ |
| | | **१६०६९६८९१** | **१६०१८२९१९** |
| | | **१६७८८९५५८** | **१६९०७११११** |
| **मत्ता** | | | |
| पूर्वीची मत्ता | | | |
| नियत मत्ता | | | |
| मुर्त मत्ता | ७ | १११०८६९ | १२००९६२ |
| मागिल गुंतवणूक | ८ | २०१२३०३० | २०१२३०३० |
| **(२) गुंतवणूक** | | **२१२३३८९९** | **२१३२३९९२** |
| प्रचलित मत्ता | | | |
| वस्तुसुची | ९ | २३२७१५७ | २१५९९१४ |
| धंद्यातील येणे | १० | ५२८७४९७ | ५१८२९८५ |
| रोख व बँक शिल्लक | ११ | ४२६६७४२० | ४३२६५६०४ |
| अल्प मुदतीचे कर्ज व आगाऊ रकमा | १२ | ९६०१६५७१ | ९६७६५५७७ |
| इतर मत्ता | १३ | ३५७०१४ | ३७३०३९ |
| **एकुण** | | **१४६६५५६५९** | **१४७७४७११९** |
| | | **१६७८८९५५८** | **१६९०७११११** |
| **ठळक लेखा धोरणे** | **१** | | |
| **आर्थिक अहवालावरील टिपा** | **१-४६** | | |

उपरोक्त संदर्भीय टिपा आमच्या आर्थिक अहवालाचा भाग आहे.

याच तारखेस आमच्या अहवालाप्रमाणे

**विरेन गांधी ॲड कंपनी**
**सनदी लेखापाल**

**( चिंतन वि. गांधी )**
**भागीदार**
**एम.नं.१३७०७९**
**संस्था नों.क्र.१११५५८ डब्ल्यु**
**ठिकाण: मुंबई**
**दिांक: १८.०४.२०१५**

कोंकण विकास महामंडळ मर्यादितच्या संचालक मंडळाच्या वतीने

**व्यवस्थापकीय संचालक,**

**संचालक**

**महाव्यवस्थापक**

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित

## दिनांक ३१ मार्च २००१४ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा—तोटा पत्रक

| तपशिल | | टिपा | ३१ मार्च २०१४ रोजी रुपय | ३१ मार्च २०१३ रोजी रुपय |
|---|---|---|---|---|
| १ **माल** विक्री महसुल | | १४ | ५१५३०८९ | ५७७४४७५ |
| इतर उत्पन्न | ... | १५ | ३१७८१२४ | ३३३६००६ |
| **एकूण महसुल** | | | **८३३१२१३** | **९११०४८१** |
| २ **खर्च** | | | | |
| वापरलेल्या साहित्याची किमंत | ... | १६ | ३५८५२९७ | ३५२०५७३ |
| वस्तुसूचीतील बदल | ... | १७ | ९०५५ | (५०३३४) |
| कर्मचारी हितेषी खर्च | ... | १८ | ४९३७०४१ | ७९५१९४१ |
| वित्तीय किमंत | ... | | -- | -- |
| **इतर खर्च** | | १९ | १४३३२१० | १५५५०९२ |
| **घसारा किंवा ऱ्हास** खर्च | | ७ | ६२१३५ | ७३५६२ |
| **एकुण खर्च** | | | **१००२६७३८** | **१३०५०८३४** |
| अपवादात्मक आणि असाधारणबाबी आणि करासह नफा | | | (१६९५५२५) | (३९४०३५३) |
| अपवादात्मक बाब | | | -- | -- |
| असाधाकरण बाब | | | -- | -- |
| **करपुर्व नफा** | ... | | (१६९५५२५) | (३९४०३५३) |
| **वजा : करखर्च** | | | | |
| **चालु वर्षी** | | | -- | -- |
| **मागील वर्षामधील घट/वाढसाठी तरतुद** | ... | | -- | -- |
| **या वर्षासाठीचा करोत्तर नफा** | .. | | (१६९५५२५) | (३९४०३५३) |
| **प्रति समभाग वाढ झालेली मिळकत ( दर्शीी मुल्य रू.१०० प्रति समभाग)** | | | | |
| १) प्रतिभाग आधारभूत वाढ | | | (०.१९) | (०.४५) |
| २) प्रतिभाग सौम्य वाढ | | | (०.१९) | (०.४५) |
| **ठळक लेखा धोरणे** | | १ | | |
| **आर्थिक अहवालावरील टिपा** | | १-४६ | | |

**उपरोक्त संदर्भीय टिपा आमच्या आर्थिक अहवालाचा भाग आहे.**

याच तारखेस आमच्या अहवालाप्रमाणे

कोंकण विकास महामंडळ मर्यादितच्या संचालक मंडळाच्या वतीने

**विरेन गांधी ॲड कंपनी**
**सनदी लेखापाल**

**व्यवस्थापकीय संचालक,**

**( चिंतन वि. गांधी )**
**भागीदार**
**एम.नं.१३७०७९**
**संस्था नों.क्र.१११५५८ डब्ल्यु**
**ठिकाण: मुंबई**
**दिाांक: १८.०४.२०१५**

**संचालक**

**महाव्यवस्थापक**

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित

## ३१ मार्च,२०१४ च्या वित्तीय अहवालाचा भाग असलेल्या टिपा

## (१) महत्वाची हिशेब धोरणे २०१३–१४

### १. हिशेब संज्ञा

(१.१) हिशेब धोरणे काही विशिष्ट संदर्भ दिला नसल्यास हे सर्वसाधारण मान्यताप्राप्त धोरणावर आधारीत आहे.

(१.२) खरेदी , विक्री व्यवहार विक्रीकर आणि इतर करांसहीत केलेली आहे.

(१.३) खर्च व उत्पन्न जे भरण्याजोगे वा प्राप्य आहे ते तंतोतंत तत्वावर काढले आहे. त्याला खालील अपवाद आहेत :–

(अ) लाभांश, सेवाशुल्क, हमीशुल्क, गुंतवणूकीवरील व्याज, कर्ज व आगाऊ रकमावरील व्याज ई.पी.पी. योजनेसाठीचे अभिकर्ता शुल्क आणि काथ्या प्रकल्पाकडून मिळणारे भाडे वगैरे रकमा रोखीच्या स्वरुपात हिशेबात आहेत.

(ब) लघु–औद्योगिक वहसातीतमधले गाळयांची मिळणारी रक्कम ही आगाऊ मिळालेले रक्कम ही त्या वर्षाचे उत्पन्न म्हणून गणली आहे

(क) समभाग भांडवलात केलेल्या गुंतवणुकीबाबत करारपत्राप्रमाणे जरी समभाग गुंतवणूक केलेली असली तरी उद्योग घटकांनी लाभांश जाहीर केला नसला तरी त्यांना गुंतवणुकीवरील व्याज द्यावे लागते व जसे जसे मिळेल त्याप्रमाणे हिशेबात घेतले जाते.

(ड) बँक ऑफ कराड (आता बंद झालेली) मधील रु.१.०० कोटींच्या मुदत ठेवीवरील व्याज हे रोखीच्या तत्वावर जेव्हा आले तेव्हा हिशेबात घेतले आहे.

(इ) कर आणि इतर सांविधानिक कर जसे विक्रीकर ,महापालीका कर,पाणीपट्टी इ.

(१.४) आर्थिक विधाने ही पूर्वीच्या मुल्यांवर आधारित आहेत. पैशाच्या बदलत्या मूल्यांतील फरक त्याच्या खरेदी करावयाच्या ताकीदीवर परिवर्तित होतो. त्यांचा किमती ठरविताना विचार केला नाही.

### २. नियतमत्ता

(२.१) नियतमत्ता ही प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे. यामध्ये वाहतूक भाडे, जकात, कर व इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश आहे.

(२.२) परिपत्रक क्र.सी.ओ.एस.१०८१/१०५६३/८१/१५७/४४४, दिनांक २९ डिसेंबर, १९८४ ला पशुधन संवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यामधील शर्तीनुसार खरेदी केलेले पशुधन किमतीत मूल्यांकित केले आहे व नवीन जन्मलेल्या पशुधनाची किंमत प्रत्येक वर्षी त्यांच्या दूध देण्याच्या क्षमतेवर काढली आहे.

(२.३) पामतेल प्रात्यक्षित प्रकल्प (महाराष्ट्र–ओ.पी.डी.एम.) संयुक्त कंपनीच्या स्वाधीन केल्यानंतर आलेली तुट ही या प्रकल्पासाठी मिळालेली महाराष्ट्र शासन केंद्र सरकार कडील विशेष अनुदारामध्ये म्हणजेच ‘भांडवली राखीव निधि मध्ये खर्ची दाखविली आहे.

### ३. घसारा

(i) कंपनी कायदा १९५६ परिशिष्ट १४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व त्या दराने नियत मत्तेवरील घसाऱ्याची तरतूद केली आहे व तो पूर्वीच्या किंमती ‘मूल्य आधारीत आहे.

### ४. गुंतवणूक

दिर्घ मुदतीची गुंतवणूक ही गुंतवणूकीच्या किंमतीवर आधारीत आहे मूल्यांकनातील ऱ्हास विचारात घेतलेला नाही.

### ५. भांडार साहित्याचे मूल्यमापन

(i) तयार मालाचे मूल्य हे कमीत कमी किंवा झालेल्या निव्वळ खर्चावर आधारित आहे.

(ii) कच्चा माल आणि इतर साहित्य यांचे मूल्यांकन प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे.

### ६. सेवानिवृत्ती दायित्व

कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम भविष्य निर्वाह निधीमधील महामंडळाची देय रक्कम खर्च म्हणून दाखविली आहे तसेच ती तंतोतंत पध्दतिने देय आहे, उपदान,रजेचे रोखीकरण हे खर्च दाखवून ज्यावेळी देय असेल त्यावेळी प्रत्यक्ष रोखीच्या स्वरुपात आहे.

### ७. आनुषंगिक दायित्व:-

कंपनी मागील घडलेल्या घटना किंवा प्रसंग ज्यामध्ये स्त्रोताच्या ऱ्हासाची शक्यता असते ज्यामध्ये निश्चीत देय दायित्वाचा अंदाज करता येतो, अशा दायित्वाची तरतुद करून ठेवते. ज्या अनुषंगिक / प्रासंगिक देय दायित्वामध्ये मोठया प्रमाणावर स्त्रोताची हानी शक्यता नसते, अशा आनुषंगिक दायित्वाची तरतुद केलेली असते ज्या अनुषंगिक / प्रासंगिक दायित्वामध्ये स्त्रोत ऱ्हासाची शक्यता अत्यंत धुसर असते, अशा दायित्वाची तरतुद किंवा प्रकटन आवश्यक नसते.

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित
## ताळेबंद २०१३–२०१४ चा भाग असलेली परिशिष्ट्ये

| | ३१ मार्च २०१४ रोजी रुपय | ३१ मार्च २०१३ रोजी रुपय |
|---|---|---|
| २ : भाग भांडवल | | |
| अधिकृत भांडवल | | |
| १०,००,००० प्रत्येकी रु.१०० चे समभाग | १०००००००० | १०००००००० |
| एकूण .... | १०००००००० | १०००००००० |
| **जारी केलेले हमी पात्र आणि भरणा केलेले भागभांडवल** | | |
| (८,८०,९९६) (२०११ : ८,८०,९९६) भरणा झालेले भाग भांडवल (वरील पैकी प्रत्येकी रु. १०० चे ८२६ समभाग हे पैशा व्यतिरिक्त मोबदल्या बद्दल देण्यात आले आहेत.) | ८८०९९६०० | ८८०९९६०० |
| एकूण भाग भांडवल | ८८०९९६०० | ८८०९९६०० |

**अ : सुरूवातीच्या शिल्लक आणि अहवाल अखेर समभाग समायोजन**

| | २०१४ | | २०१३ | |
|---|---|---|---|---|
| समभाग | सख्या | रक्कम | सख्या | रक्कम |
| सुरुवातीच्या शिल्लकी समभाग | ८८,०९,९६० | ८८,०९,९६०० | ८८,०९,९६० | ८८,०९,९६०० |
| या वर्षामध्ये जारी केलेले समभाग | -- | -- | -- | -- |
| या वर्षाअखेर समभाग शिल्लक | ८८,०९,९६० | ८८,०९,९६०० | ८८,०९,९६० | ८८,०९,९६०० |

**ब समभागाबाबतच्या अटी / शती :**

या कंपनीकडे प्रति समभाग रू. १० या एकाच वर्ग किंमतीचे समभाग आहेत. प्रत्येक भागधारक एका समभागासाठी १ मत देवू शकतो हि कंपनी भारतीय चलन रूपयामध्ये लाभांश जाहिर करते आणि अदा करते. कंपनी संचालक मंडळाने सुचविवलेला देय लाभांश याची वैधता भागधारकांची होणाऱ्या सर्वसाधारण वार्षिक सभेतील मंजूरीवर असते. दि. ३१.३.२०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वषा्साठी प्रति समभागावरील वितरणासाठी शिफारस केलेला लाभांश किंमत ही रू. ० आहे. (२०१३ : रू.०)

कंपनी समापनाच्यावेळी अधिमान्य रक्कम वितरणानंतर उर्वरित मत्ता भागधारकमध्ये वाटप करणेत येइल मालमत्तेचे वाटप रक्कम भागधारकांकडे असलेल्या समभागांप्रमाणात करणेत येइल.

**क या कंपनीची कोणी सूत्रधारी कंपनी किंवा अंतिम सूत्रधारी कंपनी नाही.**

**ड ५% पेक्षा जास्त भागधारकांचा समभाग.**

| समभाग | २०१४ | | २०१३ | |
|---|---|---|---|---|
| | सख्या | % धारक | सख्या | % धारक |
| (i) महाराष्ट शासन | ८८०९९६ | १००% | ८८०९९६ | १००% |

| | २०१४ | २०१३ |
|---|---|---|
| **३ राखीव निधी व शिल्लक** | | |
| **(i) भांडवली राखीव निधी - अनुदान व सहाय्य** | | |
| **अ दुग्ध प्रकल्पासाठी राखीव निधी** | | |
| बायोगॅस यंत्र सामुग्रीसाठी | ७४१३९ | ७४१३९ |
| नत्र वायु सयंत्र | ३४७२३१ | ३४७२३१ |
| दूध काढणे यंत्र | ७८६ | ७८६ |
| पवन चक्की | २९५ | २९५ |
| | ४२२४५१ | ४२२४५१ |
| (ब) पाम–तेल प्रात्यक्षिक प्रकल्पासाठी राखीव निधी | | |
| (भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांजकडून मिळालेले देणगी स्वरुपात मिळालेले अनुदान) | ३३२९०५५ | ३३२९०५५ |
| संदर्भ टिप्पणी क्र.१–II,(iii)आणि ३१(अ)/(ब)/(क) | ३३२९०५५ | ३३२९०५५ |

# कोंकण विकास महामंडळ मर्यादित
## ताळेबंद २०१२–२०१४ चा भाग असलेली परिशिष्ट्ये

| | ३१ मार्च २०१४ रोजी रुपय | ३१ मार्च २०१३ रोजी रुपय |
|---|---|---|
| **(क) सफाळे मीठ प्रकल्प** | | |
| उपमार्ग | ५१२६२ | ५१२६२ |
| आयोडीन युक्त मीठ प्रकल्प | १०२०२७ | १०२०२७ |
| खास अनुदान | ४३२६०० | ४३२६०० |
| पवन चक्की | ३०२० | ३०२० |
| | **५८८९०९** | **५८८९०९** |
| **(ii) नफा तोटा पत्रकांत -हास / वाढ बदल** | | |
| **मागील ताळेबंदप्रमाणे** | **(१४२७९५४४३)** | **(१३८८५५०९०)** |
| **जमा नफा / (तोटा) वर्षासाठीचा** | **(१६९५५२५)** | **(३९४०३५३)** |
| | **(१४४४९०९६८)** | **(१४२७९५४४३)** |
| **एकूण राखीव निधी व शिल्लक** | **(१४०१५०५५३)** | **(१३८४५५०२८)** |
| **४ दिर्घ मुदतीची कर्जे** | | |
| अ. सुरक्षित | .. | .. |
| ब. असुरक्षित | | |
